# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 23/02/2021 (मंगळवार)
(सकाळ)

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 03 कि. मी अंतरावर वाघोडा येथे दिनांक 22/02/2021 चे 11.30 वा. दरम्यान जखमी नामे– सौ सोनु मोहन उईके, वय 45 वर्ष, रा. वार्ड क 2, वाघोडा व आरोपी नामे– ईंदरलाल झनकलाल नवरे, वय 45 वर्ष, रा. वाघोडा, झोपडपट्टी वार्ड क 2, ता. सावनेर हे दोघेही एकामेकाचे घरा शेजारी राहणारे असुन जखमीच्या कुत्र्याने आरोपीच्या घरासमोर जाऊन घाण केली. या कारणावरून आरोपीने जखमीला शिवीगाळ करून भांडण केले. यानंतर आरोपीने थोडयाच वेळात आपल्या घरून कुऱ्हाड आणुन जखमीच्या घरात जावुन जखमीला कुऱ्हाडीने डाव्या डोळयावर, खांद्यावर, पाठीवर ठार मारण्याचे उददेशाने गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादीचे नामे– सौ. फुलकुमारी छोटु यादव, वय 45 वर्ष, रा. वाघोडा झोपडपट्टी ही यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 307, 452, 504 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री निशांत फुलेकर मो.क्र 7588564300 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कुही – दिनांक 21/02/2021 चे 03.00 वा. चे सुमारास पो.स्टे. कुही हद्दीत फिर्यादीयांची 16 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला आरोपी नामे– मोनु अंबादास वाढाई, रा. दिपाळा याने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक श्रीमती मंडवाले 9763234548 या करीत आहे.

### जबरी संभोग

पो.स्टे. मौदा :– दिनांक 01/10/2020 चे 00:01 वा. ते दिनांक 22/10/2020 चे 23.59 वा. चे सुमारास फिर्यादी यांच्या 16 वर्षीय पिडीत मुलगी ही घरी हजर असतांना आरोपी नामे– विशाल युवराज मेश्राम, वय 32 वर्ष, रा. नवेगाव रेल्वे मौदा याने तिचे घरात प्रवेश करून पीडित मुलगी हिचे तोंड दाबुन तिचे दोन्ही हात रस्सीने बांधुन तिच्यासोबत बळजबरीने जबरी संभोग केला. तसचे आरोपीने फिर्यादीला "याबाबतची माहीती कोणालाही सांगीतल्यास, मी तुझा भावांना मारून टाकीन" अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 376, 448, 506 भादंवि. सहकलम 6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलिस निरीक्षक नंदा पाटील 8419953444 हे करीत आहे.

# शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो. स्टे. खापरखेडा :– अंतर्गत वार्ड क्र. 1 चिचोली अंतरावर दिनांक 22/10/2016 चे 10.00 वा. ते 14.00 वा. सुमारास चे फिर्यादी नामे– सौ. विना प्रविण ठुणे, वय 30 वर्ष, रा. वार्ड क्र. 1 चिचोली, खापरखेडा व आरोपी नामे– पति– प्रविण रामभाउ ठुणे, रा. वार्ड क्र. 1 चिचोली, खापरखेडा यांचे रितीरिवाजा प्रमाणे लग्न झाले असून तिचे पती पासुन फिर्यादीस 03 वर्षाची मुलगी आहे. दिनांक 07/08/2016 ला फैमीली कोर्टात आरोपी याने कोर्टातुन नोटीस पाठविले व घाणरडे आरोप ठेवले. तसेच आरोपीने फिर्यादीच्या मुलीला वाऱ्यावर सोडुन कोणतीही देखभाल न करता फिर्यादीस शारीरिक व मानसिक त्रास दिला. आरोपी याने फिर्यादीस आपल्या भावाचे लग्न करीता 1,50,000/– रू ची मागणी केली.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 498, 494 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ जानुसिंग जाधव हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर